खरेदीखत / करारनामा

लिहुन देणार :- १) **श्री.बादल मनोज जैन**
वय :- ३५ वर्षे, धंदा :- व्यापार
रा.गांधी नगर, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर

२) **सौ.मिना शांतीलाल कांकरीया**
३) **सौ.कोमल विशाल कांकरीया**
यांच्यातर्फे जीपीए होल्डर
श्री.विशाल शांतीलाल कांकरीया
वय :- ४१ वर्षे, धंदा :- व्यापार
रा.एच-४६, एन-४, सिडको, छत्रपती संभाजीनगर

४) **श्री.विशाल शांतीलाल कांकरीया**
वय :- ४१ वर्षे, धंदा :- व्यापार
रा.एच-४६, एन-४, सिडको, छत्रपती संभाजीनगर

५) **सौ.विना कांतीलाल जैन**
यांच्यातर्फे जीपीए होल्डर
श्री.आशिष अशोककुमार जैन
वय :- ४० वर्षे, धंदा :- व्यापार
रा.खाराकुंवा, छत्रपती संभाजीनगर

पान २...वर

लिहुन घेणार :- **सौ.अल्पना निलेश सोमाणी**
वय :- ५० वर्षे, धंदा :- गृहीणी
रा.१०३, पहिला मजला, राठी गॅलक्सी,
कॅनॉट प्लेस, सिडको, छत्रपती संभाजीनगर

कारणे खरेदीखत करारनामा लिहुन देतो की, आमच्या नावे सिडको परिसरात असलेला **फ्लॅट नं.४०१, चौथा मजला, प्लॉट नं.२८३, एन-३, सिडको, छत्रपती संभाजीनगर** हा असुन ज्याचे बांधीव क्षेत्रफळ **१५३.०७ चौ.मी.** व कारपेट क्षेत्रफळ **१०२.८०९ चौ.मी.**आहे. सदरील फ्लॅट मिळकतीचा आम्ही आमच्या आर्थिक गरजेपोटी उपभोग घेऊ शकत नसल्या कारणाने सदरील फ्लॅट आम्ही लिहुन घेणार **सौ.अप्पना निलेश सोमाणी** यांना कायमस्वरुपी विक्री केलेला असुन सदरील फ्लॅट मिळकतीची चतुःसिमा ही खालीलप्रमाणे आहे.

पुर्वेस	:	प्लॉट नं.२८२
पश्चिमेस	:	प्लॉट नं.२८४
दक्षिणेस	:	९.०० मीटर रोड
उत्तरेस	:	प्लॉट नं.३०१

वरील चतुःसिमेच्या आतील स्वकष्टार्जीत फ्लॅट मिळकतीत सिडकोचे संपूर्ण रकमेचा भरणा लिहुन देणार यांनी केलेला असुन सदरील फ्लॅटवर सिडकोचा कर्जाचा बोजा नाही. सदरील फ्लॅट हा लिहुन घेणार यांना एकुण रक्कम **रु.७९,११,०००/-** (**अक्षरी रु.एकोनऐंशी लाख अकरा हजार फक्त**) मध्ये कायमस्वरुपी विक्री केलेले असुन सदरील विक्रीच्या संपुर्ण रक्कमेपैकी **रु.११,०००/-** (**अक्षरी रु.अकरा हजार फक्त**) हे नगदी रोख मिळाले असुन उर्वरीत रक्कम **रु.७९,००,०००/-** (**अक्षरी रु.एकोनऐंशी लाख फक्त**) हे रजिस्ट्रीच्या वेळेस देण्याचे ठरले आहे.

सदरील फ्लॅट मिळकतीचा लिहुन घेणार यांनी त्यांचे मालकी हक्काने वंशपरंपरेने उपभोग घ्यावयाचा आहे. सदरील फ्लॅट मिळकतीचे संपुर्ण कागदपत्रे मी लिहुन घेणार यांना देईल कसुर करणार नाही. सदरील फ्लॅट मिळकतीबाबत कोणतीही न्यायालयीन बाब प्रविष्ट नाही. सदरील फ्लॅट मिळकतीबाबत माझा किंवा माझी पत्नी, मुले, वारस, नातेवाईक, आप्त, इष्ट वगैरे कोणाचाही हक्क अथवा हितसंबंध राहिलेला नाही व करणारही नाही. लिहुन देणार यांची सदरील फ्लॅटसाठी ज्यावेळेस स्वाक्षरीची गरज भासेल त्यावेळेस **लिहुन देणार स्वाक्षरीसाठी हजर राहतील त्यासाठी अधिक पैशाची मागणी करणार नाही. तसेच लिहुन देणार हे मालमत्ता कर, विद्युत मिटरचे बिल तसेच पाणीपटटी कर व इतर टॅक्स हे आजच्या तारखेपर्यंत पुर्ण भरुन देतील.**

पान ३...वर

सदरील खरेदीखत करारनामा हा आम्ही आमच्या स्वखुशीने, राजीमर्जीने, वाचुन, समजुन, कोणाच्याही दबावाला बळी न पडता, कोणीतीही नशापाणी न करता लिहुन दिला असुन या लेखाखाली आम्ही आमची आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी साक्षीदारासमक्ष स्वाक्षरी केली आहे, **तसेच सिडको हस्तांतरणाचा व रजिस्ट्रीचा खर्च लिहुन घेणार हे करणार आहे.**

दिनांक :- २०/०७/२०२६

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर

साक्षीदार लिहुन देणार

१) **१) श्री.बादल मनोज जैन**

२) सौ.मिना शांतीलाल कांकरीया
३) सौ.कोमल विशाल कांकरीया
२) यांच्यातर्फे जीपीए होल्डर
श्री.विशाल शांतीलाल कांकरीया

४) श्री.विशाल शांतीलाल कांकरीया

५) सौ.विना कांतीलाल जैन
यांच्यातर्फे जीपीए होल्डर
श्री.आशिष अशोककुमार जैन

लिहुन घेणार

(**सौ.अल्पना निलेश सोमाणी**)

<u>प्रतिज्ञापत्र</u>

आम्ही **१) श्री.बादल मनोज जैन** वय :- ३५ वर्षे, धंदा :- व्यापार, रा.गांधी नगर, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर **२) सौ.मिना शांतीलाल कांकरीया ३) सौ.कोमल विशाल कांकरीया** यांच्यातर्फे जीपीए होल्डर **श्री.विशाल शांतीलाल कांकरीया** वय :- ४१ वर्षे, धंदा :- व्यापार, रा.एच-४६, एन-४, सिडको, छत्रपती संभाजीनगर **४) श्री.विशाल शांतीलाल कांकरीया** वय :- ४१ वर्षे, धंदा :- व्यापार, रा.एच-४६, एन-४, सिडको, छत्रपती संभाजीनगर **५) सौ.विना कांतीलाल जैन** यांच्यातर्फे जीपीए होल्डर, **श्री.आशिष अशोककुमार जैन** वय :- ४० वर्षे, धंदा :- व्यापार, रा.खाराकुंवा, छत्रपती संभाजीनगर.

आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की, माझ्या नावे सिडको परिसरात असलेला **फ्लॅट नं.४०१, चौथा मजला, प्लॉट नं.२८३, एन-३, सिडको, छत्रपती संभाजीनगर** हा असुन ज्याचे बांधीव क्षेत्रफळ **१५३.०७ चौ.मी.** व कारपेट क्षेत्रफळ **१०२.८०९ चौ.मी.** आहे. सदरील फ्लॅटवर सिडकोचा अथवा इतर कोणत्याही कार्यालयाचा कर्जाचा बोजा नाही. सदरील फ्लॅट हा मी **सौ.अल्पना निलेश सोमाणी** यांना कायमस्वरुपी विक्री केलेला आहे. तरी सदरील फ्लॅट हा **सौ.अल्पना निलेश सोमाणी** यांच्या नांवे करण्यास माझी काहीही हरकत नाही असा प्रतिज्ञापुर्वक ना हरकत जवाब ही लिहुन देत आहे. सदरील फ्लॅटव्यतिरीक्त सिडकोचे माझे नावावर कोणतेही घर अथवा भुखंड नाही.

पान २...वर

वरील प्रतिज्ञापत्र (ना हरकत जवाब) हे माझ्या माहितीनुसार व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. याबाबत जर काहीही उजर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझ्यावर राहील.

दिनांक : २०/०७/२०२६ प्रतिज्ञक

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर

१) श्री.बादल मनोज जैन

२) सौ.मिना शांतीलाल कांकरीया
३) सौ.कोमल विशाल कांकरीया
यांच्यातर्फे जीपीए होल्डर
श्री.विशाल शांतीलाल कांकरीया

४) श्री.विशाल शांतीलाल कांकरीया

५) सौ.विना कांतीलाल जैन
यांच्यातर्फे जीपीए होल्डर
श्री.आशिष अशोककुमार जैन

<u>प्रतिज्ञापत्र</u>

मी **सौ.अल्पना निलेश सोमाणी** वय :- ४९ वर्षे, धंदा :- व्यापार रा.दोघेही : सिडको, छत्रपती संभाजीनगर.

मी आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करते की, मी १) **श्री.बादल मनोज जैन** २) **सौ.मिना शांतीलाल कांकरीया** ३) **सौ.कोमल विशाल कांकरीया** यांच्यातर्फे जीपीए होल्डर **श्री.विशाल शांतीलाल कांकरीया** ४) **श्री.विशाल शांतीलाल कांकरीया** ५) **सौ.विना कांतीलाल जैन** यांच्यातर्फे जीपीए होल्डर, **श्री.आशिष अशोककुमार जैन** यांचा सिडको परिसरात असलेला **फ्लॅट नं.४०१, चौथा मजला, प्लॉट नं.२८३, एन-३, सिडको, छत्रपती संभाजीनगर** हा असुन ज्याचे बांधीव क्षेत्रफळ **१५३.०७ चौ.मी.** व कारपेट क्षेत्रफळ **१०२.८०९ चौ.मी.** असून सदरील फ्लॅट मी कायमस्वरुपी खरेदी केला आहे. सदरील फ्लॅटवर सिडकोचा अथवा इतर कोणत्याही कार्यालयाचा कर्ज बोजा नाही. सदरील फ्लॅट हा आमच्या नावे करण्यासाठी मुळ मालक १) **श्री.बादल मनोज जैन** २) **सौ.मिना शांतीलाल कांकरीया** ३) **सौ.कोमल विशाल कांकरीया** यांच्यातर्फे जीपीए होल्डर **श्री.विशाल शांतीलाल कांकरीया** ४) **श्री.विशाल शांतीलाल कांकरीया** ५) **सौ.विना कांतीलाल जैन** यांनी प्रतिज्ञापुर्वक ना हरकत जवाब ही लिहुन दिलेला आहे. तरी सदरील फ्लॅट हा माझ्या नांवे हस्तांतर करण्यास आमचीकाहीही हरकत नाही. सदरील फ्लॅटव्यतिरीक्त आमच्या नावावंर सिडकोचे कोणतेही घर अथवा भुखंड नाही.

पान २..वर

वरील प्रतिज्ञापत्र (ना हरकत जवाब) हा आमच्या माहितीनुसार व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. याबाबत जर काहीही उजर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आमच्यावर राहील.

दिनांक :- २०/०७/२०२६ प्रतिज्ञक

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर

सौ.अल्पना निलेश सोमाणी

दिनांक :-   /०७/२०२६

प्रति,

मा.सहा.पणन अधिकारी,
पणन विभाग, सिडको,
छत्रपती संभाजीनगर.

विषय :- फ्लॅट नं.४०१, चौथा मजला, प्लॉट नं.२८३, एन-३, सिडको, छत्रपती संभाजीनगर चे हस्तांतरण करणे बाबत.

अर्जदार :- १) श्री.बादल मनोज जैन
२) सौ.मिना शांतीलाल कांकरीया
३) सौ.कोमल विशाल कांकरीया यांच्यातर्फे जीपीए होल्डर
श्री.विशाल शांतीलाल कांकरीया
४) श्री.विशाल शांतीलाल कांकरीया
५) सौ.विना कांतीलाल जैन यांच्यातर्फे जीपीए होल्डर
श्री.आशिष अशोककुमार जैन

महोदय,

वरील विषयी विनंती करतो की, माझा सिडको परिसरात असलेला **फ्लॅट नं.४०१, चौथा मजला, प्लॉट नं.२८३, एन-३, सिडको, छत्रपती संभाजीनगर** हा असुन ज्याचे बांधीव क्षेत्रफळ **१५३.०७ चौ.मी.** व कारपेट क्षेत्रफळ **१०२.८०९ चौ.मी.** आहे. सदरील फ्लॅट मी **सौ.अल्पना निलेश सोमाणी** यांना कायमस्वरुपी विक्री केलेला असून सदरील फ्लॅटचे हस्तांतरण **सौ.अल्पना निलेश सोमाणी** यांच्या नावे सिडको कार्यालयामध्ये करुन द्यायचे आहे.

तरी कृपया सदर फ्लॅटचे हस्तांतरण करुन द्यावे ही विनंती.

आपले विश्वासू

१) श्री.बादल मनोज जैन

२) सौ.मिना शांतीलाल कांकरीया

३) सौ.कोमल विशाल कांकरीया
यांच्यातर्फे जीपीए होल्डर
श्री.विशाल शांतीलाल कांकरीया

४) श्री.विशाल शांतीलाल कांकरीया

५) सौ.विना कांतीलाल जैन
यांच्यातर्फे जीपीए होल्डर
श्री.आशिष अशोककुमार जैन